# नगर परिषद, कारंजा (लाड) जि. वाशिम.

दूरध्वनी क्रमांक ०७२५६ - २२२०२६ फॅक्स क्रमाक ०७२५६ - २२२०२५

E-mail - co.karanja@gmail.com


जा.क्र./ बांधकाम/४४८३/२०२३

दि. ११ /०९ /२०२३

प्रति,

**श्री. प्रकाश गोविंदराव परळीकर ,**
**रा. कारंजा जि. वाशिम**

विषय :- भुखंड एकत्रिकरण मंजूरीबाबत.

संदर्भ :- १. आपला ऑनलाईन अर्ज दि. १६/११/२०२२
२. आदेश मा. तहसिलदार, कारंजा यांचे कार्यालय
रा.मा.क्र.एन ए पी ३४/०१/१९९९-२००० दि. ३१/०७/२००७ चे अकृषक

उपरोक्त संदर्भीय अर्जाचे अनुषंगाने मौजे शेरपुर कारंजा शेत सर्व्हे नं. १०/२ मधील भुखंड क्र. ४२ व ४३ चे एकत्रिकरण परवानगी करिता अर्ज सादर केलेला आहे. संदर्भ पत्र क्र. २ अन्वये पारित केलेल्या अकृषक आदेशाप्रमाणे १.२१ हे.आर . अभिन्यास मंजूर करण्यात आलेला आहे. भुखंड क्र. ४२ व ४३ वर श्री. प्रकाश गोविंदराव परळीकर यांनी खरेदीखत नोंदणी दि. ११/०६/२०२१ अन्वये खरेदी करण्यात आला. भुखंड क्र. ४२ व ४३ चे एकत्रित क्षेत्रफळ ३००.०० चौ.मी. व एकत्रीत भुखंडाला ४२/४३ असा जागेचा एकत्रित नकाशा या कार्यालयाचे मंजूरीस्तव दाखल केला आहे.

त्यानूसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये सोबतचे नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे शेरपुर कारंजा शेत सर्व्हे नं. १०/२ मधील भुखंड क्र. ४२ व ४३ मधील अभिन्यासातील भुखंड क्र. ४२/४३ चे एकत्रिकरण करण्यास खालील अटी व शर्तींवर मंजुरी प्रदान करण्यात येते.

**खालील अटी व शर्ती प्रमाणे :-**

१. सदर भुखंडाचा वापर विकास नियंत्रण नियमावली नुसार अनुज्ञेय राहील.
२.सदर भुखंडाचे एकत्रिकरण व पुनर्विभाजन न.प. चे पुर्वपरवानगी शिवाय करता येणार नाही.
३. आपण सादर केलेली माहिती चुकीची किंवा दिशाभुल करणारी असल्याचे आढळून आल्यास सदर आदेश रद्द करण्यात येईल तसेच सदर उपविभाजन मंजूर झाले याचा अर्थ उपविभाजनात भुखंडावरील बांधकाम नियमीत झाले आहे असा अर्थ लावता येणार नाही.
४. सदर भुखंडाचे उपविभाजन केल्यानंतर तो ज्या भागात असेल त्याभागातील भुखंडाचे विकास नियंत्रण नियमावलीतील नियम लागू होतील.
५. उपविभाजीत भुखंडाकरिता सांडपाणी जाण्याकरिता व्यवस्था करणे आवश्यक राहील.
६. सदरहू भुखंडावर न.प. कडुन बांधकाम परवानगी घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम करण्यात येवू नये.
७. सदरहू भुखंडावर बांधकाम करतांना लगेतचे भुखंड धारकाचे सुविधा अधिकारास बाधा येता कामा नये.
८. भुखंडाचे एकत्रिकरण व विभाजन करिता परवानगी देण्यात आली आहे. सदर भुखंडाचे मालकीहक्कासंबंधी निर्णय करण्यात आलेला नाही. मालकीहक्काबाबत शासकीय दस्ताऐवजानूसार अधिकार राहील.
९. क्षेत्रफळाबाबत किंवा मालकीहक्काबाबत काही वाद निर्माण झाल्यास ही मंजूरी रद्द समजण्यात यावी.
१०. सदर भुखंडाचे सरकारी अभिलेखात नोंद करून त्याचे आखीव पत्रीका तयार करावे लागेल. त्यानंतरच बांधकाम परवानगी देण्यात येईल.

PDF processed with CutePDF evaluation edition www.CutePDF.com

११. एकत्रित भुखंडाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | भुखंड धारकाचे नाव | भुखंड क्र. | भुखंडाचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | गोलाईचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश गोविंदराव परळीकर | ४२ | १५०.०० | ०.०० | १५०.०० |
| २ | श्री. प्रकाश गोविंदराव परळीकर | ४३ | १५०.०० | ०.०० | १५०.०० |
| | | एकूण | ३००.०० | ०.०० | ३००.०० |

| अ.क्र. | भुखंड धारकाचे नाव | भुखंड क्र. | भुखंडाचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | गोलाईचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश गोविंदराव परळीकर | ४२/४३ | ३००.०० | ०.०० | ३००.०० |
| | | एकूण | ३००.०० | ०.०० | ३००.०० |

नियोजन प्राधिकारी
तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद कारंजा (लाड)

प्रत :-मा. तहसिलदार कारंजा यांना मौजे शेरपुर कारंजा शेत सर्व्हे नं. १०/२ मधील भुखंड क्र. ४२ व ४३ चे एकत्रिकरणा नंतरचे मंजूर नकाशासह नियमानुसार कार्यवाहिस्तव कळविण्यात येत आहे.

नियोजन प्राधिकारी
तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद कारंजा (लाड)